**सरकार वि. प्रविण अशोक पवार**
निशाणी क्र. ४१/क

सरकार तर्फे साक्षीदार क्र.५ ची जबानी
मी या व्दारे सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो कीः

माझे नाव - रंगराव पांडुरंग पवार,
वय - ५३ वर्षे,
हुद्दा - पोलीस निरीक्षक,
नेमणूक - बंडगार्डन पोलिस स्टेशन, पुणे, जि. पुणे.

**सरतपास सरकारी वकील श्री. व्ही. एस. गवई यांचे मार्फत शपथेवर सुरु....**

१) मी जुलै २०१५ ते जुलै २०१७ या कालावधीत खालापूर पोलीस स्टेशन मध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक म्हणून काम करत होतो व चौक दुरक्षेत्र येथे कार्यरत होतो. दि. २८/०८/२०१६ रोजी सदरचा गुन्हा माझ्याकडे तपासासाठी आला होता. दि. २७/०८/२०१६ रोजी माझ्याकडे हर्षदा हरीभाउ माळी यांनी त्यांच्या सासुची अकस्मात मृत्यु नोंद केली होती. कुत्र्याने त्यांच्या सासुवर झडप मारल्याने डोक्यावर पडून त्यांचा मृत्यु झाला होता. त्यानंतर पोस्ट मॉर्टम व इन्क्वेस्ट करण्यासाठी चौक ग्रामीण रुग्णालय यांना कळवण्यात आले. इन्क्वेस्ट पंचनामा माझ्या समक्ष करण्यात आला होता. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी ४२** देण्यात आली. त्याचप्रमाणे मृत्युच्या कारणाबाबत प्रमाणपत्र देण्यात आले त्यास **निशाणी ४३** देण्यात आली. दुस-या दिवशी हर्षदा माळी यांनी आरोपी प्रविण पवार याच्या विरुध्द फिर्याद नोंदवली. खबरी जबाब पोलीस खरे यांनी नोंदवला व फिर्याद पाटील यांनी नोंदवली. छापील प्रथम खबरी अहवालास **निशाणी ४४** देण्यात आली. मी दोन पंचांसमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला. घटनास्थळ हे फिर्यादी व आरोपी यांच्या घराजवळ चौक बाजारपेठ ते चौक फाटा येथे आहे. मी प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे तपास टिपण नोंदवले. मी घटनास्थळाचे ६ फोटो काढले होते. त्या सर्व फोटोंना एकत्रित **आर्टीकल ए** देण्यात आले. आरोपी कडून कुत्र्याचे कागदपत्र प्राप्त केले.

त्यांना एकत्रित **आर्टीकल बी** देण्यात आले. पशु वैद्यकीय अधिकारी यांना त्या कुत्र्यावर उपचार घेतले आहेत किंवा नाही याबाबत माहिती देण्यासाठी पत्र दिले होते त्या पत्रास **निशाणी ४५** देण्यात आली व त्यांच्याकडून आलेल्या उत्तरास **निशाणी ४६** देण्यात आली. ग्रामपंचायत चौक यांना पत्र दिले व कुत्रे पाळण्याच्या लायसन्स बाबत विचारणा केली. त्या पत्रास **निशाणी ४७** व ग्रामपंचायत यांनी दिलेल्या उत्तरास **निशाणी ४८** देण्यात आली. त्यानंतर धिरुभाई अंबानी हॉस्पीटल यांना जखमांबाबत अभिप्राय देण्यासाठी पत्र दिले. त्या पत्रास **निशाणी ४९** व हॉस्पीटल कडून प्राप्त झालेल्या अभिप्रायास **निशाणी ५०** देण्यात आली. त्यामध्ये त्यांनी गंभीर दुखापत असे नमूद केलेले होते. चौक ग्रामीण रुग्णालय यांना पोस्ट मॉर्टम रिपोर्ट मिळण्याबाबत पत्र दिले. त्यामध्ये डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने मृत्यु झाल्याचे नमूद केलेले आहे. मी पाठवलेल्या पत्रास **निशाणी ५१** व पोस्ट मॉर्टम रिपोर्टला **निशाणी ५२** देण्यात आली. तपासामध्ये असे निष्पन्न झाले की, फिर्यादीच्या सासु शौच्छालयात जावून परत येत असताना आरोपीच्या कुत्र्याने त्यांच्यावर झडप टाकली त्यामुळे त्या रस्त्यावर असणा-या दगडावर पडल्या त्यामुळे त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली त्यामुळे त्या मयत झाल्या. आरोपीच्या निष्काळजीपणामुळे त्यांचा मृत्यु झाला म्हणून मी आरोपी विरुध्द दोषारोप पत्र दाखल केले. मी आरोपीला ओळखतो. आरोपी आज न्यायालयात हजर नाही.

**सरतपास संपला.**

**आरोपीतर्फे वकीलांनी मुदतीचा अर्ज दिला तो नामंजूर करण्यात आला. आरोपी हजर नाही त्यामुळे उलटतपास नाही असा आदेश करण्यात आला.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत.**

SANYOGITA SUBHASHRAO DESHMUKH

Digitally signed by SANYOGITA SUBHASHRAO DESHMUKH
Date: 2026.08.14 17:19:51 +0530

**( एस. एस. देशमुख )**
न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,
कोर्ट क्र.१, खालापूर.

स्थळ - खालापूर.
दिनांक - १४/०८/२०२६